INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 7 | AUGUST – 2024

# बी.एड. शिक्षणात विद्यार्थिनींना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास

**डॉ. खजूरकर दे. त्र्यं.**
**श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, धाराशिव.**

**सारांश :**

स्त्री शिक्षण, उच्च शिक्षण तसेच व्यावसायिक शिक्षण या तिन्हींच्या परिपाक असलेल्या बी.एड.च्या अभ्यासक्रमात बहुतांश संख्येने विद्यार्थ्यांचा प्रवेश असतो. प्रस्तुत लेखांमध्ये बी.एड. अभ्यासक्रम पूर्ण करताना येणाऱ्या महत्त्वाच्या अडचणींचा अभ्यास करण्यात आला आहे. विद्यार्थिनींना यशस्वीपणे अभ्यासक्रम पूर्ण करताना येणाऱ्या आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक तसेच आरोग्य विषयक इ. सारख्या विविध बाबींमध्ये विचारात घेण्यात आले आहेत. सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीच्या आधारे शिफारशी मांडले आहेत.



**प्रस्तावना :**

"जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगतास उधारी" असे मातृभावपर वर्णन स्त्रियांविषयी आपल्या समाजात पहावयास मिळते.सावित्रीबाईंनी हाल अपेष्टा, त्रास सहन करून पाळण्याच्या दोरी सोबत शिक्षणाची दोरीही या स्त्रियांच्या हातात अथक परिश्रमांनी मिळवून दिली. स्त्री शिक्षणाचे सावित्रीबाईंनी लावलेले रोपटे आज मोठे वृक्ष बनले आहे. या स्त्री शिक्षणाच्या वृक्षाची फळे समाजात सर्वजण आज आनंदाने चाखत आहेत. आजची स्त्री हि शिक्षण, आरोग्य, व्यवसाय, उद्योग, संरक्षण, कृषी इत्यादी क्षेत्रांमधून यशस्वीपणे कार्यकरताना दिसत आहे.

आज शिक्षण क्षेत्रात मुलांपेक्षा मुली या आघाडीवर आहेत. विविध शाखेच्या अभ्यासक्रमास विद्यार्थिनीं प्रवेश घेत आहेत. यामध्ये शिक्षणशास्त्र शाखा मागे कशी असेल? आजच्या वर्तमान परिस्थितीत मागील पाच सहा वर्षांपासून मुलींच्या शिक्षणाचा टक्का आणखी वाढल्याचे दिसून येते. मागील दोन-तीन वर्षात संशोधकाच्या महाविद्यालयातील प्रमाण हे 75% च्या जवळपास आलेले दिसून येते. एक काळ अल्पसंख्यांक म्हणून कोपऱ्यात दडून राहणारा हा वर्ग आज बहुसंख्यांक झाला असून त्यात वर्गातील बहुतांश जागेवर आपल्या क्षमतेने व सामर्थ्याने अधिकार मिळवला आहे. अशा या बहुसंख्य वर्गात बी.एड. चा दोन वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास सदर संशोधनात करण्यात आला आहे.

## बी.एड. अभ्यासक्रमास विद्यार्थिनींचा अधिक प्रवेश होण्यामागील विविध कारणे

काही वर्षांपासूनचे निरीक्षण विचारात घेता बी.एड. अभ्यासक्रमास विध्यार्थिनींचा वाढता ओघ दिसून येतो. यासंदर्भात पालकांशी संवाद साधला असता महत्त्वाची कारणे आढळून आली ती पुढील प्रमाणे होत.

1. शिक्षकांना आजही समाजात मानाचे स्थान आहे.
2. स्त्रियांकरिता शिक्षकी व्यवसाय हा सुरक्षित व्यवसाय आहे.
3. अधिक शारीरिक कष्ट नसल्याने स्त्रियांसाठी शिक्षकी व्यवसाय उपयुक्त व्यवसाय आहे.
4. व्हाईट कॉलर जॉब असल्याने अधिक कल.
5. अन्य व्यवसायांपेक्षा कामाचे तास कमी असल्याने घरकाम सांभाळून शिक्षक नोकरी करू शकतात.
6. शासकीय नोकऱ्यांची संधी.
7. खाजगी शिकवण्या घेऊन कुटुंबास भविष्यात हातभार लावण्यासाठी उपयुक्त.
8. स्वतःच्या मुलांना संस्कार लावण्यासाठी, शिकविण्यासाठी उपयुक्त.
9. मुलींना स्वतःच्या पायावर उभे करून देण्यासाठी.
10. चांगले स्थळ मिळून विवाह कार्य संपन्नतेसाठी.

या व अशा विविध कारणांमुळे. बी एड. शिक्षणास विद्यार्थिनींचा प्रवेश वाढत आहे.

### प्रस्तुत लेखातील महत्त्वाच्या संज्ञा:

बी.एड., विद्यार्थीनी, अडचणी, शिक्षण इ.

### संशोधन शीर्षक :

बी.एड. शिक्षणात विद्यार्थिनींना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास

### उद्दिष्ट:

1. विद्यार्थ्यांना. बी.एड. अभ्यासक्रम पूर्ण करताना येणाऱ्या अडचणींच्या अभ्यास करणे.
2. विद्यार्थ्यांना बी.एड. अभ्यासक्रम पूर्ण करताना येणाऱ्या अडचणींवर उपाय सुचविणे.

### गृहीतक :

बी.एड. चे शिक्षण घेत असताना विद्यार्थिनींना अडचणी जाणवतात.

### संशोधना कार्याची व्याप्ती :

1. प्रस्तुत संशोधन कार्य धाराशिव शहरातील श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, धाराशिव या महाविद्यालयाशी संबंधित आहे.
2. संशोधन कार्य हे बी.एड. विद्यार्थिनींशी संबंधित आहे.

## संशोधना कार्याच्या मर्यादा :

1. श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, धाराशिव या महाविद्यालया व्यतिरिक्त अन्य कोणत्याही महाविद्यालयाचा संशोधन कार्याकरिता विचार केलेला नाही.
2. प्रस्तुत संशोधन कार्य हे विद्यार्थिनींच्या अडचणींपुरते मर्यादित आहे.

## नमुना निवड:

श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, धाराशिव या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष 2023-25 मधील प्रथम व द्वितीय वर्षांच्या छात्रा-अध्यापकांपैकी सर्वच 70 विद्यार्थिनींची निवड करण्यात आली आहे.

## संशोधन पद्धती :

सदर संशोधन हे वर्तमानकालीन समस्येची संबंधित असल्याने वर्णनात्मक संशोधनातील शालेय सर्वेक्षण या संशोधन पद्धतीचा वापर यासाठी करण्यात आला आहे.

## संशोधनाची साधने :

माहितीचे संकलन करण्याकरिता प्रश्नावली या साधनांचा वापर सदर संशोधन कार्यासाठी करण्यात आला आहे.

## संशोधन कार्यपद्धती :

सदर संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. यासाठी श्रीमती सुशीलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन,धाराशिव या बी.एड. महाविद्यालयातील 70 विद्यार्थिनींना प्रश्नावलीचे वितरण करण्यात आले. त्यातील 60 विद्यार्थिनींचा प्रतिसाद मिळाला. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन केले. टक्केवारी या संख्याशास्त्रीय परिमाणाचा वापर करून शेवटी निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात आल्या आहेत.

## निष्कर्ष :

विद्यार्थिनी प्रश्नावलीतून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

1. प्रवेश घेतेवेळी एक रकमी प्रवेश फीस भरण्यात अडचण जाणवते असे बहुतांश विद्यार्थिनींचे म्हणणे आहे.
2. विवाहित विद्यार्थिनींना बऱ्याच वेळा पती वगळता सासरकडील अन्य व्यक्तींचे सहकार्य कमी प्रमाणात मिळते असे दिसून येते. अविवाहित मुलींना आई-वडिलांकडून भरपूर सहकार्य मिळते.
3. वसतिगृहात किंवा खाजगी खोली करून राहणाऱ्या विद्यार्थिनींना गोपनीय स्वातंत्र्य मिळत नाही असे दिसून येते. बऱ्याच बाबी देव-घेव मध्ये वापरावे लागतात त्यामुळे काही प्रमाणात मानसिक तणाव येतो असे दिसून येते.
4. विवाहित मुलींना घरकाम अथवा शेती काम पूर्ण करून अभ्यास व प्रात्यक्षिक कार्य करावे लागतात त्यामुळे दिलेल्या वेळेत कार्य जमा करणे सादर करणे अथवा तपासून घेणे कठीण जाते. ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांचीही सारखीच अडचण दिसून येते.

5. बऱ्याच बाहेरगावाहून येणाऱ्या, वसतिगृहात राहणाऱ्या व खाजगी खोली करून राहणाऱ्या मुलींना आरोग्य विषयक समस्या जाणवतात.
6. बऱ्याच मुलींना महिलांविषयक आजारांविषयीचे स्थानिक पातळीवरील तज्ञ डॉक्टरांची माहिती अल्प प्रमाणात आहे.
7. खाजगी खोलीवर, वसतीगृहात तसेच अध्यापन वर्गात समायोजन करून घेताना अडचणी जाणवतात असे बहुतांश विद्यार्थिनींचे म्हणणे आहे. यामागील महत्त्वाचे कारण बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थिनी मधील विविधता होय.
8. बऱ्याच विद्यार्थिनींचे मत आहे की महाविद्यालयाच्या सार्वजनिक विद्यार्थिनी स्वच्छतागृहांची संख्या अपुरी असल्याने अडचण येते.
9. महाविद्यालयातील पिण्याच्या पाण्याची सोय उत्तम असल्याचे सर्वच विद्यार्थिनींचे म्हणणे आहे.
10. बऱ्याच प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनींना भविष्यात शिक्षक व्यवसायात कार्य करण्यासाठी द्यावयाच्या सीईटी, सिटीईटी, टीईटी यासारख्या स्पर्धा परीक्षांविषयी माहिती अल्प असल्याचे दिसून येते.
11. सहल, क्षेत्रभेट व अन्य सामाजिक उपक्रमात सहभाग घेताना बऱ्याच वेळा घरच्यांना समजावून सांगणे कठीण जाते असे निम्म्याहून अधिक विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.
12. बहुतांशी अविवाहित विद्यार्थिनींना महाविद्यालयाच्या गणवेशाची अडचण जाणवते.
13. घरची परिस्थिती बेताची असणारे, वेळेवर शिष्यवृत्ती मिळाली नसल्याने आर्थिक अडचणी जाणवतात असे म्हणणाऱ्या विद्यार्थिनींचे प्रमाण कमी आहे.
14. सवलतीच्या दरात पास मिळत असल्याने रोज एसटीने ये-जा करणाऱ्या विद्यार्थिनींना अभ्यासाकरिता कमी वेळ मिळतो ठराविक वेळेसच एस.टी.बस असल्याने प्रसंगी लवकर महाविद्यालय सोडावे लागते असे म्हणणे दैनिक प्रवास करणाऱ्या विद्यार्थिनींचे आहे.

## शिफारशी :

1. आर्थिक अडचण असणाऱ्या विद्यार्थ्यांची खातरजमा घेऊन प्राचार्यांनी दोन किंवा तीन टप्प्यात फीस भरण्याची सवलत द्यावी.
2. विवाहित विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रवेशा वेळी स्वतंत्र समुपदेशन कार्यशाळा घेऊन त्यांच्या सहकार्याचे महत्त्व समजावून सांगावे.
3. खाजगी खोली करून , वस्तीगृहात दैनिक प्रवास करणाऱ्या विद्यार्थिनींना आरोग्य तपासणी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.
4. खाजगी खोली करून, वस्तीगृहात अथवा दैनिक प्रवास करणाऱ्या विद्यार्थिनींना सकस आहार व व्यायामाचे महत्त्व पटवून देणारी कार्यशाळा आयोजित करावी.
5. खाजगी खोली करून, वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे एकत्र राहण्यासाठी कराव्या लागणाऱ्या तडजोडींबाबत शिक्षक प्रशिक्षकांनी वेळोवेळी मार्गदर्शन करावे.
6. सर्व वर्ग एक संघ राहील, एका कुटुंबाप्रमाणे राहील यासाठी महाविद्यालयातील सर्वच मानवी घटकांनी वारंवार प्रयत्न करावेत जेणेकरून विद्यार्थ्यांनी मधील विविधतेचा त्यांच्या प्रगतीवर दुष्परिणाम होणार नाही.

7. सार्वजनिक महिला स्वच्छतागृहांची संख्या महाविद्यालय प्रशासनाने वाढवावे.
8. भविष्यातील व्यावसायिक प्रगती करण्याकरिता कराव्या लागणाऱ्या मार्गदर्शनासाठी महाविद्यालय, प्रशिक्षकांनी तत्पर राहावे.

## समारोप:

सावित्रीबाईंचा वसा घेऊन जाणाऱ्या सावित्रीच्या लेकींना बी.एड. अभ्यासक्रमात अडचणी येतात. आर्थिक अथवा विशिष्ट कौटुंबिक वगळता बऱ्याच छोट्या-छोट्या अडचणी या विविध उपायांमुळे सोडविता येण्यासारख्या आहेत. प्रस्तुत संशोधन कार्यातून या अडचणी संशोधकास समजल्या या क्षेत्रात काम करणाऱ्या अभ्यासकांना याचा निश्चितच उपयोग होईल.

## संदर्भ:

1. भिलेगावकर आणि डॉ. मोरे: **शिक्षक शिक्षण** ; पुणे: नित्य नूतन प्रकाशन .
2. भिंताडे वि.रा.:(1968): **शैक्षणिक संशोधन** ;पुणे: नूतन प्रकाशन.
3. गायकवाड, कुंडले आणि कुंभार(2009), **अध्यापन व्यवसायाचे आकलन**, कुलसचिव यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक
4. जगताप ह.ना.(1992); **शिक्षणातील नवविचार प्रवाह व नवप्रवर्तन**
5. पाटील लीला, कुलकर्णी विश्वंभर(1974); **आजचे शिक्षण आजच्या समस्या**
6. सप्रे नीलिमा, पाटील प्रीती, पाटील ज्योती;(2009) **गतिमान शिक्षणासाठी विचार प्रवाह**